(३)

जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे. १. यांचे कार्यालय,
दिनांक :- २९ जानेवारी, १९८५.

5 FEB 1985

प्रति
शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद,
पुणे

विषय : सन १९८५-८६ या शैक्षणिक वर्षात [ जून १९८५ पासून ] खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

मराठी/इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस परवानगी.

संदर्भ : शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. पीएसएम-१०८४/(१०२६) प्राशि-३ दिनांक ३१/१२/८४ चे पत्र.

वरील विषयासंबंधीचे या कार्यालयास उद्देशून लिहिलेले व आपले कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भित पत्र कृपया अवलोकावे.

२/- या बाबत कळविण्यात येते की, खालील नमूद केलेल्या संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, १९८५ पासून नेहमीच्या विहित अटीवर तसेच "खास बाब" करून खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | सुरु असलेले वर्ग | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| | कॅम्प एज्यु. सोसायटी 2075 सी पुणे-१ जॉन मल्कम स्ट्रीट पुणे-१. | इंग्रजी प्राथमिक शाळा पुणे-१. | पहिली | इंग्रजी. |

३/- या बाबत आपणास कळविण्यात येते की, संस्थेबाबत खालील नमूद केलेल्या अटींची खात्री करून घ्यावी.

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम असली पाहिजे. [ इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करणार नाही, अशा प्रकारे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीनिशी लेखी हमीपत्र प्राप्त करून या कार्यालयाकडे पाठविण्याची दक्षता घ्यावी. ]

True copy
[signature]
२९/११/86

..२/-

H.B. Resn No 8(d) dt 9/2/85 Refers
[signature]